निगमित संप्रेषण एवं निवेशक संबंध

प्रधान कार्यालय : लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे - 5

टेली -020 :25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या भागधारकांची 18 वी वार्षिक सर्वसाधारण सभा व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमाद्वारा संपन्न.

पुणे दि. 24 जून 2021: बँक ऑफ महाराष्ट्रची 18वी वार्षिक सर्वसाधारण बैठक दि.24 जून 2021 रोजी संपन्न झाली. या बैठकीत दि.31 मार्च 2021 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक मंजूरीसाठी भागधारकांसमोर ठेवण्यात आले. सदर ताळेबंदाला मान्यता देताना भागधारकांनी बँकेच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. सध्याच्या कोविड-19च्या साथीमुळे ही वार्षिक सर्वसाधारण बैठक सीडीएसएल च्या मदतीने व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारा घेण्यात आली.

बँकेच्या कामगिरीत सुधारणा होण्यासाठी व्यवस्थापन करीत असलेल्या प्रयत्नांची भागधारकांनी प्रशंसा केली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक श्री. ए.एस. राजीव यांनी भागधारकांना संबोधित करताना बँकेच्या कामगिरीतील ठळक वैशिष्ट्यांची आणि बँकेच्या विविध योजनांची माहिती दिली.

बँकेचे कार्यकारी संचालक श्री. हेमंत टम्टा व श्री. ए. बी. विजयकुमार, संचालक श्री. हृषिकेश मोड़क, श्री. एम. के. वर्मा व श्री. आर. थामोधरन, बँकेचे सर्व सरव्यवस्थापक, भारत सरकारचे प्रतिनिधी आणि बँकेचे लेखा परिक्षक हे या बैठकीस उपस्थित होते.




**फोटोमध्ये (डावी कडून):** बँक ऑफ महाराष्ट्र चे कार्यकारी संचालक श्री हेमन्त टम्टा, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए. एस. राजीव व कार्यकारी संचालक श्री. ए. बी. विजयकुमार 18 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेला व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमाद्वारा संबोधित करताना.